# प्रभुतरुण

वर्ष ४९ | अंक १२ | मुंबई | जून, २०१६ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटत्ये**


*संपादकीय*

## कच्रेमे रहने दो, कचरा ना उठाओ...?

**—सुहासिनी कीर्तिकर**

### कृतज्ञ स्मरण



**विहंग नायक**

हल्ली वर्तमानपत्र उघडलं की खळबळजनक बातम्यांचा नुसता 'सुकाळू'च असतो. त्यात विनोद तावडे, एकनाथ खडसे भुजबळांच्या वाटेवर जाऊन वेगळेच भुज बळ दाखवताना दिसतात. गांधी घराण्याचा कुलदीपक राहुल वेगळेच तेज उधळताना दिसतो. अम्मा कितीही भ्रष्टाचारी साड्या पचवोत; हक्काच्या पदाची नवीन भरजरी साडी त्यांना लाभते. ...असं फक्त नेतेच खळबळजनक बातम्यांचा पुरवठा करतात; असं नव्हे. क्रिकेट अनेकांची विकेट काढतो; चित्रपटातील तारे नको त्या गोष्टीत चमचमतात. अन् आपण हे सगळे चमचमीत खाद्य चवीचवीनं रोजच्या रोज खात असतो. समाजस्वास्थ्याचा विचार केला तर; हे सगळे 'जंकफूड'च. पण काय करणार? फळफळावळ महाग, भाज्या दुर्मीळ. उन्हाळा रणरणता. अहो; परवा मी साधा पेरू एकशेवीस रुपये किलोने घेतला! होय! पेरूच! रुपे नव्हे. (रूपे = चांदी) सध्या सगळी चांदीच चालली आहे. मग वृत्तपत्रातील हे खाणे तसे चघळायला परवडणारे हो! शिवाय खुसखुशीत!! या वर्तमानपत्री बातम्यात आणखीही घटनांची (अपघातांची) फोडणी असतेच. कुठे इमारत कोसळली, कुठे मंत्रालयाला आग लागून महत्त्वाच्या फायली त्यात स्वाहा (?) झाल्या, कचराडेपोला आगीने खाऊन खाऊन गिळून टाकले! आधीच्या दशकात मुंबईतल्या गिरण्यांना अशा आगी लागत (?) त्यानंतर तेथे टॉवर्स उभे रहात. त्यातूनच लालबाग एरिया आता 'लोअर वरळी' झालाय ना? हे कमी म्हणून की काय; ट्रेन/बसच्या प्रवाशांना मध्येच अपघातांना सामोरे जावे लागते, 'ट्रॅफिक' समस्या उभ्या ठाकतात. पण आपण या सगळ्या 'चवदार' गोष्टी खाऊन खाऊन आता त्यांना सपक समजायला लागलो आहोत. म्हणूनच वर्तमानपत्रं अलीकडे मानवी विकृतींनी वेढलेल्या घटनांवर 'फोकस' करतात. विद्यापीठीय भ्रष्टाचार म्हणे उपहारगृहाच्या ठिकाणी होतोय. खरंच आहे. अहो, ज्याला पैसा खायचाच आहे त्याला असे खाऊकेंद्रच हवे ना? 'पैसे खाणे' ही एक विकृती. लहान कोवळ्या बालिकांवर अत्याचार करून मारून टाकणे ही आणखी एक वासनाविकृती. या विकृतींचा कळस गाठणाऱ्या आणखी काही बातम्या येतच असतात. मध्यंतरी ठाण्याला 'इद्दत'साठी सासरी गेलेल्या बहिणी मुलाबाळांना घेऊन माहेरी आल्या होत्या; तर रात्रीच्या मेजवानीनंतर त्याच कुटुंबातल्या तरुण भावाने लहान बाळापासून म्हाताऱ्या आईपर्यंत कुटुंबातील एकूण तेरा जणांना मारून टाकले! तेरा जणांना!! संस्कृतीचे, संस्कारांचे तीनतेरा करणारी ही कृती नोकरदार, शिक्षित कुटुंबीयाने करावी? अमानवी! ही कुठली विकृती हो? विध्वंसकारी मनाचा हा कुठला अविष्कार? वाचताना मनावर काटा आला अगदी. हे मृत्यूचे भयानक काण्ड शहरी संस्कृतीतच घडले. अगदी कालपरवा भयानक नव्हे; पण अतर्क्य अन् मानसिक विकृती दर्शवणारी अशी बातमी आपण

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## ''स्त्री जन्मा तुझी कहाणी'' भाग २

**-भक्ती शेटत्ये**

जशा प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे स्त्री रुपी पैलूलाही दोन बाजू आहेत. आजची स्त्री ही केवळ सोशिक राहिलेली नसून काही वेळेस ती स्वैराचारी, बेभान, तारतम्य सोडून वागत असताना पाहायला मिळते...

याचा दोष कुणाला द्यायचा? माता-पित्यांना, परिस्थितीला की समाजाला...

आज प्रत्येक घरातील स्त्री ही शिकलेली आहे, स्वत:चे निर्णय ती स्वत: घेण्यास सक्षम आहे. आजकाल मध्यमवर्गीयच नाही, तर सर्व थरातील घराघरांमध्ये लग्ना आधीपासून मुली स्वतंत्र निर्णय घेताना दिसतात. खरंतर एका जागरूक आईने आपल्या मुलीला पूर्ण स्वावलंबी (शारीरिक, मानसिक, संस्कार) दृष्ट्या पूर्ण सक्षम करूनच सासरी पाठवणे हे गरजेचे असते.

पण तसे नेहमीच होते का?

कधी कधी काही तरी राहून जाते आणि याचे परिणाम संपूर्ण कुटुंबाला, समाजाला भोगावे लागतात. आजची स्त्री ही आधुनिक, स्वतंत्र विचाराची, 'हायली प्रोफेशनल' आहे. तिला लग्न हवं, सोपस्कार हवे, पण बंधने नको. विवाहामुळे विशेषत: स्त्री स्वातंत्र्यावर बंधने येतात, म्हणून आजची स्त्री बंधनमुक्त होऊ इच्छिते. तिला स्वातंत्र्य हवे आहे. त्यात काही वावगं नाही. पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. काही मर्यादा सांभाळाव्या लागतात. व्यक्तिस्वातंत्र्य, अभिरुचीस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य ही केवळ स्वैराचाराची वेगळी नावे आहेत.

पबमध्ये दारू पिऊन आणि रात्री बेरात्री भटकणे, याला स्त्री स्वातंत्र्य म्हणायचे, तर या स्वातंत्र्याची कटू फळेही आनंदाने स्वीकारली पाहिजेत. कोणतेही स्वातंत्र्य अनिर्बंध नसते. ही गोष्ट विसरून स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार या विचार प्रणालीला खतपाणी घालण्याचा हा परिणाम आहे. मद्य पिऊन बेफामपणे गाडी चालवण्यात कसलं आलंय थ्रील? ह्या मस्तवाल स्त्रियांना केवळ पैशाची धुंदी आणि तारुण्याचा झाकोळ आलेला असतो.

कॉर्पोरेट जगात स्त्रीने धुम्रपान करणे तर जणू शिष्टाचार बनत चालला आहे. पुरुषांनाही लाजवील असे अपशब्द अगदी सहजरित्या अलगद उद्गारले जातात. स्त्रीची अशा रीतीने एवढी प्रगती भविष्यात होईल, असे सावित्री बाईंना स्वप्नात देखील वाटले नसेल.

जागतिक महिला दिन आला की, स्त्रियांच्या प्रश्नांची, समस्यांची, त्यांच्या प्रगतीची मांडामांड सुरू होते. मग काही तक्ते, संशोधन, निष्कर्ष आणि त्या स्थितीतून स्त्री बाहेर यावी यासाठीच्या नियोजनांची चर्चा होते. स्त्रीयांची अधिक प्रगती व्हावी याबद्दल शंकाच नाही. ती एक चांगलीच गोष्ट आहे. पण तीचा पहिला प्रश्न असतो की, पुरुषांच्या कचाट्यातून स्त्री मुक्त झाली पाहिजे. तिला पुरुषांइतकेच सर्व स्तरांवर स्थान मिळाले पाहिजे. स्त्री म्हणजे, समंजस, सुंदर, मृदू, चतुर, उच्च विचार, संस्कारी अशी सर्वसाधारण जनधारणा असते. पण स्त्रियाच ही सर्व आपली वैशिष्ट्ये नष्ट करण्याच्या मागे लागल्या आहेत. स्त्री स्वावलंबनाच्या चुकीच्या समजुतीमुळे, अनेकदा त्या घातकी निर्णय घेऊन मोकळ्या होतात.

जे कायदे स्त्री संरक्षणासाठी बनवले गेले आहेत त्याचाच फायदा स्वत:च्या स्वार्थासाठी करून घेतात. आजची स्त्री ही स्वतंत्र तर आहेच, पण स्वत:वर बंधन लादू इच्छित नाही. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील फरक समजण्याची कुवत जर तिच्यात नसेल तर अशा उच्च शिक्षणाचा काय उपयोग?

लग्न हे भारतीय संस्कृती टिकवणारा एक मुख्य घटक आहे. संसार म्हटलं की तडजोड ही आलीच.

(पान २ कॉलम ३ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

वाचली. काय तर म्हणे; मुलुंडसारख्या सुसंस्कृत उपनगरात सोसायटीतल्या एका ब्लॉकमध्ये तेरा वर्षांचा कचरा साठला होता. माणसं बारा वर्षांचं तप करतात. त्यावर एक अधिक तब्बल तेरा वर्षं त्या घरातला कचरा बाहेरच टाकला गेला नाही. हां! हां! माणसंही रहात होती बरं त्या कचऱ्याच्या पसाऱ्यात. शेवटी अनेकांच्या तक्रारीनंतर महानगरपालिकेच्या व्यवस्थापनाने या समस्येत लक्ष दिलं. तर काय? चार ट्रक्स भरभरून कचरा बाहेर काढला गेला. भाज्यांचा कचरा, रद्दीचा कचरा, गॅस सिलेंडर्स, प्लॅस्टिक, धूळ अशा पसाऱ्यात असलेल्या म्हातारीला बाहेर काढले गेले. अतर्क्यच ना!

या बातमीनं माझ्या विचारांचा कचरा (!) झाला हो. पण मग शांत मनानं विचार करायला लागले. मग गंमतच झाली. साध्या साध्या गोष्टीत आपणपण असा कचरासंचय करतच असतो ना! फक्त तो ट्रक्स बोलावून वितरण करत नाही इतकंच. आठवा बरं; आपापल्या घरातले पूर्वीचे माळे. त्या माळ्यावर काय नसायचे? तांब्यापितळेची मोठमोठाली भांडी, ताटं, पराती. पुढे स्टीलचा जमाना आला. प्लॅस्टिकचा आला. पण ही पिढीजात आठवण आपली माळ्यावर साचलेली. एकेकाळी महत्त्वाची असलेली कागदपत्रांची ट्रंक (आता 'ट्रंक' म्हणजे काय ते नव्या पिढीला समजाऊन सांगावे लागेल) तशीच धूळ खात पडलेली. त्यावर हात फिरवून नको ती कागदपत्रे काढून टाकावीत ना? पण त्यासाठी वेळच नाही. मोडकं सामान, पुढच्या पिढीला होईल या आशेने ठेवलेले बाळाचे पाळणे, नादुरुस्त नळांचे पाईप, एखादं जुन्यापान्या कपड्यांचं गाठोडं.... किती किती गोष्टींनी माळा आपला 'पिढीजात' श्रीमंत! अहो; माळाच नव्हे; तर आपल्या परभांच्या अनेक घरात ऐसपैस जागा असूनही पूर्वी सोफ्यावर, सोप्यात, कोपऱ्यात धूळ खात पडलेली बोचकी दिसायची. काय असायचे त्यात राम जाणे! ('रामा' गडीही कधीकधी जाणे!) ही माणसाची संचयवृत्तीच कचराच कचरा करत रहाते. नवीन फर्निचर घरात आले तरी जुन्याला कवटाळून रहायचे आणि वावरताना घर माणसांसाठी नव्हे; तर या वस्तूंसाठी 'म्यूझियम' थाटात भरायचे. कचरा संचयाचाच एक भाग हो तो.

हा कचरा जर आपल्या घराचाच भाग ठरतो; तर मग रस्त्यातील कचऱ्याविषयी काय बोलायचे? रोजच्या रोज सफाई कामगार नाकाला फडकी बांधून शहर कचरामुक्त करीत असतात. रोज पन्नास टन कचरा मुंबईतून उचलला जातोय. पण उपयोग काय? घरगल्ल्या, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे ही कचराकुंड्याच जणू! प्लॅस्टिक पिशव्या नकोत म्हणून कायदा आणा. आपण हेच प्लॅस्टिक सोय म्हणून वापरून पालिकेची गैरसोय करतो. कचरा साफ होणे हा स्वच्छतेचा अटळ भाग आहे. पण 'येथे कचरा टाकू नये' अशी पाटी असो; वा देवदेवतांची चित्रे असलेल्या तिथे लाद्या असोत; अगदी नेम साधून अशा ठिकाणीच कचरा टाकण्याचा 'सुजाण'पणा(?) आपण दाखवतो. 'येथे थुंकू नये' या पाटीवरच पानाच्या पिचकाऱ्या आढळतात. अहो! परदेशातील काही शहरवस्तीत या 'रंगकाम' करण्याच्या खासीयतीमुळे भारतीयांना राहू देत नाहीत. 'पान खायें सैंया हमारो' असणारे हे वीर 'छिंट लाल लाल' सरळ सरळ सार्वजनिक भिंतींवर मारतात हो! कदाचित 'पर्देमें रहने दो, पर्दा ना उठाओ'च्या चालीवर 'कच्रेमें रहने दो कचरा ना उठाओ' असे या महाभागांचे ब्रीदवाक्यच असावे. पण यामुळे आपली 'भारतीय' प्रतिमा परदेशातील लोक कचऱ्यात टाकतात. त्याचे काय?

घरादारातील हा जैविक, 'सवयीक' (सवयीने झालेला म्हणून 'सवयीक'!) कचरा एकवेळ कचरामुक्त शहर योजनेत साफ होईलही. अलीकडे नाही का; गंगानदीतील कचरा काढून टाकण्याची मोहीम सुरू आहे. पण मनातील कचऱ्याचे काय? 'राम तेरी गंगा मैली'च या बाबतीत. आधी 'मन म्हणजे पवित्र गंगा' हेच आपल्या मनात (?) नसते ना? नदीचे पाणी सतत वहाते असते. असावेच. ते साचले की तेथे 'भोवरे' निर्माण होतात तेथल्या तेथे फिरल्याने. कमी कमी होत साचले की प्रवाहित होण्याचा गुणधर्म (पाणीधर्म?) विसरून मग त्याचे डबके होते. आपल्या मनाचेही असेच असले पाहिजे स्वाभाविकपणे. आपल्या आयुष्यात झालेले क्षुल्लक अपमान खरं तर आपल्या वाहत्या जीवनात (जीवन = पाणीच ना?) वाहून गेले पाहिजेत. ते खऱ्या अर्थाने शिळे, पारोसे झालेले असतात. काही वेळा अपमान करणाऱ्या व्यक्तीही काळाच्या पडद्याआड गेलेल्या असतात. पण मन? ते आपला हा सगळा कचरा साठवून ठेवते. कडू आठवणींच्या भोवऱ्यात भोवंडत रहाते. मग आपण तेवढे चोख. बाकीचे छळवादी! चोखपणे सगळा कचरा साचत, साठवत आपण पुढे जाण्याचेच विसरतो. कधी या 'आपण चोख' या भावनेचाच इतका कचरा साठतो की उठसूट आपण दुसऱ्यावर टीका करत रहातो. दुसऱ्याचा कचरा करत रहातो. आमच्या परिसरात एक वेडा आहे. जेव्हा पहावं तेव्हा तो सतत हातवारे करत टीकेचा भडिमार करत असतो. तो एक वेडाच हो! पण आपण? कदाचित् या बाबतीत सात वेडे! याचा दोष काढ, त्याची चूक दाखव,' मला सगळं कळतं'चा आव आणत कुणाकुणाला सुनव, खरडपट्टी काढ;.... असा सगळा कचरा आपण इथंतिथं बाहेर फेकतच रहातो. गंमत म्हणजे हा 'आव आणणे' आहे हेच आपल्याला कळत नाही. म्हणजे त्या बातमीत कचऱ्यात रहाणाऱ्या म्हातारीला, तिच्या मुलाला कळलंच नाही ना; की आपण घरात नाही - कचऱ्यात रहातो आहोत ते! त्यांनी ते काय मुद्दाम केलं असेल का? आपण कचऱ्यातच जगतोय हे कळायला तर पाहिजे ना? आपल्यातल्या अनेकांना मनातल्या कचऱ्यातच आपण रहात आहोत हे कळतच नाही. मग कचरामुक्तीची मोहिम आखायची कशी?

मोहिम आखायची तर आणखी एक आखावी लागेल. सध्या माहितीचा (ज्ञानाचा नव्हे) महापूर आलाय. संगणक यंत्रणेने, नेटने ('गुगल'ने टाकलेला हा गुगली!) हे पूरग्रस्त वातावरण तयार केले आहे. सगळे विश्वच आपल्या जगण्याच्या अंगणात आले आहे. पण याच आपल्या अंगणात यामुळे आनंदाची, समाधानाची पाखरं चिवचिवतील याची खात्री नाही. मग हा सारा माणसाने उभा केलेला नवा पसारा म्हणजे कचराच ना? हां! एक मात्र आहे हं! कचऱ्यापासून खत करता येतं. कचऱ्यापासून नवीन उत्पत्ती करता येते. तोच कचरा जाळून त्याचा परत वेगळ्या रूपात वापर करता येतो (रिसायकलींग) अन् असा वापर अंगणात नवीन आनंदाची, उपयोगाची झाडं लावू शकतो. नाहीतरी 'मुक्ती' म्हणजे जगण्यापासून पळून जाणे नव्हे; दूर जाणे नव्हेच. आहे त्याच 'जगण्याच्या पसाऱ्या'त राहून कचऱ्यातून मुक्त होणे म्हणजे मुक्ती.

तर मंडळी, आपण असे वेगवेगळ्या थरांवर कचरामुक्त होऊ या. सध्या परीक्षांचे निकाल जाहीर होत आहेत. मी मनातला, बुद्धीतला सगळा 'कचरा' बाजूला सारून परीक्षांत यशस्वी झालेल्यांचे मनापासून अभिनंदन करते. दुसऱ्याच्या आनंदात सहभागी होण्याने बऱ्याच अंशी 'कचऱ्या'चा निचरा होत असतो. असा आनंद मला मिळावा म्हणून यशस्वी विद्यार्थ्यांची माहिती आम्हाला कळवावी. सामाजिक आनंदाच्या अभिसरणाने खूप गोष्टींचा निचरा होत असतो. असा निचरा व्हावा म्हणून हातभार लावा. लावालच म्हणा!

*

विस्तारित संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

माझ-तुझं हे वाद विरून 'आपलं' ही भावना रुजायला हवी. तुझा पैसा - माझा पैसा हा वाद मुळातच नसायला हवा. घराचे आर्थिक कर्तेपण दोघांकडेही समान असायला हवे. लग्नानंतर संसाराची आर्थिक जबाबदारी ही पती-पत्नी दोघांची असते आणि असायलाच हवी.

आपल्या हक्कासाठी सतत भांडणारे पतीपत्नी आपल्या मुलांसमोर कोणता आदर्श ठेवतात? आपल्या भांडणाने मुलांवर काय परिणाम होतील याचा गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे. विभक्त कुटुंबात केविलवाणी अवस्था जी होते ती त्यात होरपळणाऱ्या मुलांची. त्यांची काय बरं चूक असते यात? पण शिक्षा, ही त्यांनाच होते आणि तेही त्यांची काहीही चूक नसताना. त्यांनाही इतर मुलांप्रमाणे सर्वसाधारण आयुष्य जगण्याचा अधिकार आहे, याचा विचार कुणीतरी करायला हवा. आणि वर त्या निष्पाप जीवाला अंकुश लावायला 'समाज' सुद्धा अग्रेसर होतो.

सुखी संसार लाथाडून भौतिक सुखाच्या मागे लागणाऱ्यांना काय बरं म्हणावं? स्वबळावर नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे अशा प्रसंगी कौतुक केले जाते. पण स्त्रीचे खरे वैभव म्हणजे संसाररथाचे चाक होणे. कुटुंब व्यवस्था टिकविण्याची आणि आपल्या प्रपंचाचा गाडा पुढे नेण्याची मोठी जबाबदारी ही स्त्रीचीच असते. जशी दुधात साखर विरघळावी तशी स्त्री ही आपल्या संसारात रुळावी हे अपेक्षित असते. घराला घरपण देणारी जशी एक स्त्रीच असते तशीच घराला उद्ध्वस्त करायलाही स्त्री कारणीभूत होऊ शकते. (काही अंशी)

स्थिर व आनंदी आयुष्यासाठी तीने पुरुषाच्या खांद्याला खांदा दिला पाहिजे. स्त्री ही जास्त प्रमाणात धाडसी होत चालली आहे. सरळ घटस्फोट घेऊन मोकळी होते. मागचा पुढचा कुठला ही विचार न करता. आणि त्यामुळं समाजात चुकीची मूल्ये स्थापित होत आहेत. शोषित, पिडीत, आणि खूप काही सोसणाऱ्या स्त्रियांचे जिव्हाळ्याचे प्रश्न खूप आहेत, त्याचबरोबर एकीकडे पत्नी पीडितांचीही संख्या वाढत आहे. तेव्हा चुकीच्या मूल्यांमुळे आपण पुरुषांवर अन्याय तर करत नाही ना? असाही विचार केला गेला पाहिजे?

''पतीकडून मार खाणारी स्त्री बिचारी ठरते'' कारण ती दुबळी असणे गृहीत आहे. ''पत्नीकडून मार खाणारा नवरा हास्यास्पद ठरतो'' कारण तो आक्रमक असणे गृहीत आहे. परंतु या दोन्ही प्रवृत्तींकडे सहानुभूतीने पाहावे हीच खरी समानता.

*

लेख क्रमांक ५

## दूरदेशातून-

# छोटा गंधर्व आणि गंधर्वगान

-By Sujan Rane

from USA. Sujanrane@yahoo.com



नाट्यसंगीत हा मराठी संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे आणि त्याच्यावर कितीही संकटे आली तरी तो अधूनमधून डोके वर काढत असतो. त्याचं मुख्य कारण म्हणजे मराठी माणसाचं त्याच्यावर जीवापाड प्रेम. 'कट्यार काळजात घुसली' हे नाटक पुरुषोत्तम दारव्हेकरांनी बऱ्याच वर्षांपूर्वी लिहिले; पण त्याच्याबद्दलची ओढ अजून कमी होत नाही. किंबहुना त्याचे सिनेमात रूपांतर पाहण्यासाठी महाराष्ट्रात व अमेरिकेत लोकांनी एवढी गर्दी केली की तो एक उच्चांक आहे असं म्हणावं लागेल. नाटकाचे कथानक, सचिन पिळगावकर यांचा अभिनय व राहुल देशपांडे आणि महेश काळे यांच्या गाण्यांनी नाट्यसंगीत पुन्हा एकदा प्रकाशात येवू लागले आहे. नाट्यसंगीताच्या इतिहासाकडे पाहिले तर ही १९४०-१९४५ च्या परिस्थितीची पुनरावृत्ती आहे असे वाटते. सिनेमा ह्या त्यावेळच्या मनोरंजनाच्या नवीन माध्यमाने लोकांच्या मनाची एकदम पकड घेतली. १९०५ ते १९४५ काळ जरी बालगंधर्वांनी आपल्या अभिनयाने आणि गाण्याने गाजवला तरी मराठी नाट्यसंगीतावर सिनेमा व त्यातील पार्श्वसंगीताचा परिणाम होऊन मराठी नाटके मागे पडू लागली.

अशा परिस्थितीत मराठी नाटक आणि विशेषत: त्यातील संगीत जीवंत ठेवणं ही साधीसुधी गोष्ट नव्हती. ती उल्लेखनीय कामगिरी छोटा गंधर्व यांनी केली. त्यांच्या अद्वितीय गोड आवाजामुळे त्यांनी नाट्यसंगीत १९४० ते १९८० या काळात पुन्हा एकदा उभं केलं. याचं श्रेय त्यांच्या अतिशय गोड आणि लडिवाळ गाण्याच्या शैलीत सापडते. सौदागर नागनाथ गोरे ऊर्फ छोटा गंधर्व यांचा जन्म १८ मार्च १९१८ साली कोरेगाव, सातारा इथे झाला. अगदी लहानपणी त्यांनी दामुअण्णा जोशी यांच्या बालमोहन नाटक मंडळीत शिरकाव केला व १९२८ साली ते पुण्यात प्रथम रंगमंचावर आले. त्या वयातसुद्धा त्यांच्या अवर्णनीय गोड आवाजाने लोकांच्या मनाची पकड लवकरच घेतली. दामुअण्णा तेव्हापासून त्यांना आवडीने 'छोटा गंधर्व' म्हणू लागले. बालमोहन नाटक मंडळीत असताना प्रथम दत्तुबुवा बागलकोट व नंतर नरहरबुवा पाटणकर, सवाई गंधर्व, भुर्जी खान यासारख्या मातब्बर गवयांची तालीम त्यांना लाभली. पतियाळा घराण्याचे उस्ताद शेंडे खाननी त्यांना बऱ्याच अप्रचलित रागातल्या चीजा शिकवल्या असे नमूद केले गेले आहे. सुरुवातीला ते स्त्रीपात्रांची कामं करायचे; पण १९३४ पासून त्यांचा आवाज फुटल्यानंतर ते पुरुषपात्रांत चमकू लागले. अत्रे यांच्या 'घराबाहेर'-१९३४, 'उद्याचा संसार'-१९३६ व 'लग्नाची बेडी'-१९३६ या नाटकात त्यांच्या भूमिका चांगल्याच रंगल्या. त्या तरूण वयात ते एक उदयोन्मुख नाट्यसंगीत गाणारे म्हणून लोकांच्या समोर आले.

१९४०-४५ नंतर बालगंधर्वांचं गाणं जसं ओसरत चाललं तसा छोटा गंधर्वांचा नाट्यक्षेत्रात ठसा उमटायला लागला. १९४३ साली त्यांनी बालमोहन नाटक मंडळी सोडली व कलाविकास मंडळ ही स्वत:ची संस्था स्थापन केली. त्या नावाखाली 'मैलाचा दगड', 'फुल पाखरे', 'गुणी बाळे' ही नाटकं सादर केली. परंतु ना. ग. जोशी लिखित 'देवमाणूस' हे त्यांचं नाटक विशेष गाजले. याचं मुख्य कारण त्यांनी स्वत: लिहिलेली नाट्यगीतं. 'दिलरुबा मधुर हा दिलाचा', 'चांद माझा हा हासरा', 'सुखवी तया संसारा' व 'छळी जीवा दैवगती' यांनी लोकप्रियतेचा जणू काही कळस गाठला. याचा पुरावा म्हणजे ही गाणी विसाव्या शतकाच्या दुसऱ्या ५० वर्षात रेडिओवर लोक सतत ऐकत होते. लवकरच त्यांनी संगीत नाटकं 'मानापमान', 'सौभद्र', 'मृच्छकटिक' आणि 'संशय कल्लोळ' यांत प्रमुख भूमिका करून मराठी रंगमंच १९४३ ते १९७८ म्हणजे ३५ वर्षे गाजवला. 'मानापमाना'तील 'चंद्रिका ही जणू,' 'प्रेमसेवा शरण' व 'प्रेमभावे जीव जगिया' ही गाणी घरोघरी प्रसिद्ध झाली आणि अजूनसुद्धा गाणारे त्यांच्या पद्धतीने ती गाणी मेहफिलीत सादर करतात. १९६० साली त्यांनी 'सुवर्णतुला' या नाटकाचं संगीत दिग्दर्शन केलं. ते इथेच थांबले नाहीत तर; ते 'पठ्ठे बापूराव', 'रंगल्या रात्री अशा' व 'पुढारी' या बोलपटात पार्श्वगायन केलं. १९७८ साली रंगमंचाला रामराम म्हटल्यावर त्यांनी हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतावर लक्ष केंद्रित केलं व बसंती-केदार, नंद-बसंत, गुणी-कंस, मालती-कंस, भुवनेश्वरी असे राग तयार केले. याशिवाय त्यांनी कर्नाटक संगीतात वाचस्पती, वगधीश्वरी व जनसममोहिनी असेही राग निर्माण केले. ते शेवटी पुण्यात स्थायिक झाले आणि बालगंधर्व रसिक मंडळ व भारत गायन समाज या दोन संस्थेशी बरीच वर्षे निगडीत होते. त्यांना अनेक पुरस्कारांनी भूषविले गेले होते, त्यात विष्णुदास भावे पुरस्कार (१९८०) संगीत नाटक अकादमी व महाराष्ट्र गौरव पुरस्कार (१९९०) हे पुरस्कार मुख्य होते. बाल गंधर्वानंतर रंगमंचावरचे हे अद्वितीय गोड गळ्याचे नाट्यगीत गाणारे व संगीतकार रत्न १९९७ साली इहलोक सोडून गेले.

नाट्यसंगीताच्या संदर्भात ६०व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन २३ फेब्रुवारी १९८० अध्यक्षपदी त्यांनी जे उद्गार काढले ते लक्षात ठेवण्यासारखे आहेत. ते मी इथे उद्धृत करत आहे. ''हल्लीची संगीत नाटके यशस्वी होत नाहीत असे मी म्हणायला तयार नाही. पूर्वीच्या संगीत नाटकाइतके हल्लीच्या संगीत नाटकातले संगीत नाट्य कथानकाशी एकजीव झालेले आढळत नाही. पूर्वी संगीतनाटक हा जणू सलग शब्द होता. संगीत आणि नाटक असे आपण म्हणत नाही. पण हल्ली मात्र संगीत आणि नाटक असे म्हणावे लागते. नाटकाशी संगीत एकजीव होणे म्हणजे काय ? असा प्रश्न विचारला जाईल. जेव्हा स्वरांनीही कथानक सांगताना दिसते, तेव्हा संगीत नाटकाशी एकरूप झालेले असते. नाटकाशी संगीत एकजीव होण्यासाठी नाटकातील पदांची स्थाने योग्य असावी लागतात. योग्य जागी पदे घालण्याची कला सर्वात उत्कृष्ट खाडिलकरांनाच साधली होती. 'नभ मेघांनी आक्रमिले' ह्या पदातील विजेचा कडकडाट प्रत्यक्ष रंगभूमीवर दाखवण्याची आवश्यकता नाही. समर्थ नट आपल्या स्वरांनी आणि तानेच्या कडकडाटाने विजेचा आभास निर्माण करू शकेल. मला जुन्याचे प्रेम आणि नव्याचे आकर्षण आहे. तरीही असे म्हणावेसे वाटते की जुने ते जुनेच राहू द्या. दुसरे नवे जरूर करा. पण जुन्याला नवे बनवू नका. त्याला आधुनिक 'टच' देवू नका. 'प्रिये पहा' या गाण्याच्या वेळी प्रत्यक्ष सूर्य उगवल्याचे दृश्य रंगभूमीवर दाखवू नका. नटाच्या स्वरात तितकी ताकद असेल तर तो आपल्या स्वरांनी सूर्योदयाचा भास नक्की निर्माण करेल. शेवटी, गाणे--मग ते नाटकातले असो की कोणतेही असो--ते गोडच असायला पाहिजे. जे गोड नाही ते गाणेच नाही. जशी साखर ही गोडच पाहिजे तरच तिला साखर ही संज्ञा प्राप्त होते. मुखाशी आणि कानाशी ज्या गोष्टींचा संबंध येतो त्या गोष्टी गोडच हव्यात!''

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# लग्न पहावे करून

**-प्रणिता प्रभाकर**

*(अॅड. सौ. केतकी जयकरांचा लेख वाचल्यानंतर प्रणिता प्रभाकरांनी हा लेख लिहिला आहे. त्या समुदेशक आहेत.)* -संपादक

समाजात स्त्री आणि पुरुष ह्या दोन जाती अस्तित्वात आहेत, अगदी अनादी काळापासून. तेव्हा आणि आतामध्ये खूपच फरक आहे, एकूणच त्यांच्या अस्तित्वासंबंधी. आदिमानवापासून सुरुवात करण्यापेक्षा आपण आपल्या काही पिढ्या आधीपासूनचा विचार करूया. जेव्हा बालविवाहाची प्रथा चालू होती. देवलांच्या 'शारदा' नाटकातूनही हेच दाखवण्यात आले आहे. परंतु हळुहळू सामाजिक बदलाने ह्या प्रथा बंद झाल्या व स्त्री शिक्षणाचे वारे वाहू लागले. एकाअर्थी हे खूपच चांगले झाले; कारण एक मुलगी शिकली तर सारे घर शिकते. परिणामी समाजातील इतर संस्थांवरही (शिक्षणसंस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था इत्यादी) त्याचा अनुकूल प्रभाव पडून सातत्याने स्थित्यंतरे घडून येऊ लागली.

मुलींचे विवाहाचे वय वाढत गेले आणि शिक्षणाची पातळीसुद्धा. आजच्या घडीला स्त्री पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करतेय आणि घरातदेखील ती त्याच्याकडून हीच अपेक्षा करते. इतकेच नव्हे तर; ती अपेक्षापूर्ती होताना दिसून येते. परंतु हे होत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती अशी की, विवाह होतात; पण संसार मांडले जात नाहीत. आजकाल घटस्फोटाचे प्रमाण आवाक्याबाहेर गेलेले जाणवते. ह्या गोष्टीची कारणमीमांसा करणे जरूरीचे आहे.

'स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी' म्हणत रडत बसण्यापेक्षा आणि दुसऱ्यावर अवलंबून राहाण्यापेक्षा 'मी माझ्या पायावर उभी राहणे जास्त पसंत करेन' ही आजच्या स्त्रीची मानसिकता आहे. ही मानसिकता असणे हे एकार्थी बरोबरच आहे. समाजात बदल आपोआप घडून येत नाहीत; तर ते होत असलेल्या घडामोडींवर अवलंबून असतात. ह्याचा अर्थ असा की, आपल्याकडील पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेत होत असलेली स्त्रियांची कुचंबणा आणि त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हळुहळू बदलत गेला. आजची स्त्री ही कोणाच्याही मुखत्यारीत नसून खूपच स्वतंत्र आहे. आजच्या आधीची पिढी घर, संसार, नोकरी सर्वकाही सांभाळून होती. अर्थातच तिला तिच्या नवऱ्याचे आणि सासरच्यांचे पाठबळ होतेच. परंतु काही अंशी तिला सासरच्यांची मर्जी सांभाळून राहावे लागे. कुटुंबसंस्था जोपासली जात होती. काही वेळेस तिला तिच्या इच्छा आकांक्षांना मुरड घालावी लागे. हे सर्व आजची स्त्री म्हणजे मागल्या पिढीतील मुलीने उघड्या डोळ्याने पाहिले असते. इतकेच नव्हे तर प्रत्येक आईला वाटत असते ते असे की मी जे काही भोगले ते माझ्या मुलीच्या वाट्याला येऊ नये. म्हणून तिने आपल्या मुलीला काही बंधने न घालता मनस्वी आणि स्वच्छंदीपणाने वागण्याची मुभा दिली. आईचा तसा काही वाईट हेतू नसतो. परंतु मुली खूप शिकल्या, मुलगा-मुलगी यामध्ये भेद मानला जात नाही ह्याची जाणीव होणे, स्वत:चे मत ठामपणे मांडता येणे, ह्या सर्व गोष्टींमुळे आजच्या मुलीचे स्वतंत्र व्यक्तिमत्व निर्माण झाले. तिचे स्वत:बद्दलचे विचार आणि निर्णय तीच घेऊ लागली. पर्यायाने तिचे विश्व स्वत: भोवतीच निर्माण झाले.

तिच्या ऐकिवात असलेल्या आणि डोळ्याने पाहिलेल्या घटनांची तिच्या आयुष्यात पुन्हा निर्मिती होऊ नये ह्याची ती कटाक्षाने काळजी घेते आणि म्हणूनच स्वत:चे आयुष्य स्वत:च्या मर्जीने जगण्याचा चंग बांधते. असे करीत असताना सृष्टीच्या नियमाप्रमाणे तिच्यात योग्यवेळी योग्य तेच बदल होत असतात आणि पर्यायाने ती विरुद्ध लिंगी आकर्षणात अडकली जाते. ते क्षण तिला टाळायचे नसतात; परंतु सवयीप्रमाणे स्वच्छंदीपणालाही मुरड घालायची नसते. ती स्वत:च्या आयुष्याविषयी ठाम असल्याकारणाने तिला कोणाचीही लुडबूड अथवा ढवळाढवळ चालत नाही. विरुद्ध लिंगी आकर्षणात अडकल्या कारणाने तिला लग्न करणे भाग असते. किंबहुना तिच्याकडे दुसरा पर्याय नसतो. कारण तिला माहिती असते की 'लिव इन रिलेशनशिप' आज मितीस तरी समाजास पूर्णपणे मान्य नाही. तेव्हा तिची लग्नास मान्यता असते; परंतु पुढील जबाबदाऱ्या कशा घ्यायच्या ह्याची पूर्णपणे माहिती नसते. ह्याचे खरे कारण काय हे आपण शोधणे महत्त्वाचे आहे. कदाचित आपण असा विचार करू शकतो की स्वैर, स्वच्छंदी जीवन जगत असताना तिने हळुवारपणे स्वत:च्या जबाबदारीकडे कानाडोळा केला असेल किंवा माहिती असूनही आपल्या नवऱ्याकडून जबाबदारी पेलली जावी ही माफक अपेक्षा. म्हणजे जसा माझा संसार तसा तुझाही संसार आहे. घराची संपूर्ण जबाबदारी आपण दोघांनी मिळून घ्यावी, ही तिची अपेक्षा असते. ही एक बाजू किंवा कारण झाले. आता दुसरी बाजू किंवा कारण म्हणजे मुलाचे घरातून होत असलेले पालन, जोपासना, सांभाळ (Upbringing), काही घरांमध्ये मुलगा म्हणून काहीच घरकाम सांगायचे नाही किंवा हे तुझे 'काम नाही' अशा गोष्टी सतत मनावर बिंबवत गेल्याकारणाने तसेच सर्व गोष्टी हातात, बोटात होत असल्याने त्याच्या हे खिजगणतीतच नसते. त्यामुळे एका बाजूने स्त्रीमुक्तीविषयी बोलायचे आणि अनवधानाने (शब्दप्रयोग मुद्दामून केला आहे) मुलाचे पालन परंपरेप्रमाणे करायचे ह्या दोन विरुद्ध बाजू आहेत असे मला वाटते. काही अंशी आजच्या परिस्थितीला घरातील वडीलधारी मंडळीच कारणीभूत असावीत असे मला वाटते. तेव्हा जग कितीही पुढे गेले असले तरीही संसार करताना नवरा आणि बायको दोघांनाही समान जबाबदारी घेणे अपरिहार्य आहे. मुलाने म्हणजेच नव्या पिढीतील नवऱ्याने नवरेशाही दाखवणे किंवा मुलीने म्हणजेच बायकोने संसार वाऱ्यावर सोडणे योग्य नाही. संसार करताना थोड्याफार प्रमाणात तडजोड ही आलीच. जिथे तडजोड नाही तिथे संसार नाही. मग त्यामुळे घराला घरपण राहत नाही. काम वाटून न घेता हमरीतुमरी होते आणि त्याचे पर्यवसान घटस्फोटात होते. हे होणे न लागे म्हणून काही उपाययोजना करणे जरुरीचे आहे. माणसाने स्वकेंद्रित न होता समोरच्याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. खास करून अनोळखी व्यक्तीशी विवाह करताना म्हणजे प्रेमविवाह न करता मोठ्यांच्या ओळखीतून किंवा एखाद्या विवाहसंस्थेतून विवाह जमवून करताना होय. हे होत असताना दोघांनी एकमेकास ओळखणे महत्त्वाचे आहे. त्याकरिता कमीतकमी एक वर्षाचा अवधी जाणे महत्त्वाचे असते. म्हणजेच त्या अवधीत दोघांना एकमेकांचा पूर्णपणे अभ्यास (ओळख) करता येतो. प्रत्येकामधील गुण-अवगुण पारखता येतात, तसेच समजून घेण्यास वेळ मिळतो. हे सर्व होत असताना फक्त शरीरानेच नव्हे तर मनानेही दोघे एकमेकांजवळ येतात. इतकेच नव्हे तर एकमेकांबद्दल आदरभाव निर्माण होतो तसेच स्वभाव समजून घेण्यास मदत होते. हे करत असताना स्वत:साठी नव्हे तर आपल्या आयुष्याच्या जोडीदारासाठी आपण आपल्या स्वभावाला थोडी मुरड घालणे महत्त्वाचे असते. असे केल्याने संसार वाऱ्यावर उडून न जाता तो टिकण्यास मदत होते. आजकालचे संसार म्हणजे राजाराणीचे संसार असतात. त्यात त्यांना इतरांची लुडबूड चालत नाही. ठीक आहे. परंतु संसार हा दोघांचा असतो, कोण्या एकाचा नसतो म्हणून एकमेकांना एकमेकांनी समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे.

बरे आता ऋतुचक्राप्रमाणे पाहता स्त्री ही सोशिक मनोवृत्तीची असते असे म्हणतात. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे परिस्थिती बदलली आणि स्वभावात बदल दिसून आले. ती खूपच bold & beautiful वाटायला लागली. सरकारने जे काही कायदे स्त्रीसंरक्षणाकरिता केले त्याचा अवाजवी फायदा आजची शिकलेली स्त्री घेताना दिसून येते. हे करणे म्हणजे निव्वळ आप्पलपोटेपणा म्हणता येईल. ह्या तिच्या स्वभावाच्या पैलूची कारणमीमांसा सहज करता येईल. म्हणजेच तिच्या वाचनात, ऐकिवात किंवा काही माध्यमांद्वारे अनुभवास आलेला असा पुरुषाने आणि एकूणच समाजाने स्त्रीची केलेली अवहेलना किंवा छळ होय. ही कदाचित सूडाची भावनाही असू शकेल. परंतु असे वागणे म्हणजे स्त्रीची ताकद नव्हे. त्याऐवजी प्राप्त परिस्थितीतून सुवर्णमध्य शोधून काढणे आणि तेसुद्धा दोघांच्या मदतीनेच होय. हे करण्यासाठी आपण तहान लागता विहीर न खणता आधीपासूनच त्याची तजवीज करणे योग्य होईल. ते म्हणजे असे की शिक्षण पूर्ण करून जेव्हा नोकरी करू लागतात तेव्हा त्यांना विवाह पूर्व समुपदेशन करणे योग्य होय. तसेच आजकाल कॉर्पोरेट जगातही लैंगिक शोषणाच्या घटना घडत आहेत (sexual harassment at work place.) तेव्हा स्त्री आणि पुरुषांचा एकमेकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे सुखावह आहे.

ह्यामुळे एकूणच जीवनशैली सुखकर होऊ शकते.

*

## न्याय

न्यायदेवता आंधळी आहे
न्यायदेवता निष्ठुर आहे
न्यायदेवता करारी अन् कठोर आहे
की हे केवळ शाब्दिक अवडंबर आहे?
वास्तव फार विचित्र आहे
कायद्याचे राज्य ही पुस्तकी संज्ञा आहे
काय द्यायचे हीच परिचित रीतभात आहे
रंकाना एकपत्नीत्वाचे बंधन आहे
पण आंबटशौकी रावांची बाळे गल्लीबोळात वावरत आहेत
गरीब, असहाय जीव न्यायासाठी आस लावून आहेत
पण हा न्याय मात्र धृतराष्ट्राच्या भूमिकेत वावरत आहे
कोर्ट कचेरीतला हा न्याय
भाई-दादांच्या टपरीवर वाटला जातोय
अन् सामान्य जनांचा भरवसा
त्या विलंबाच्या कालावधीत भरडला जातोय
कोण छेडेल हे अन्यायाचे दुष्टचक्र?
कोण बनेल तो बाल अभिमन्यू?
पुन्हा एकदा या भारताला
बाबासाहेबांची नितांत गरज आहे

**-हेमंत विनायकराव तळपदे**

# व्यंगचित्र ही भाषा आहे

**-प्रदीप कोठारे**

१५ मार्चला एक अनपेक्षित फोन व एस.एम.एस. आला. १६ आणि १७ एप्रिल २०१६ रोजी सावरकर स्मारक, शिवाजी पार्क, मुंबई येथे प्रसिद्ध व्यंगचित्रकार हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेतून साकारलेल्या अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकार संस्था 'कार्टूनिस्ट कंबाईन' तर्फे 'व्यंगदर्शन संमेलन' आयोजित केले आहे, तरी आपणास व्यंगचित्रकार म्हणून निमंत्रण. आपले नवीन व्यंगचित्र, फोटो परिचय, पत्ता, फोन, ईमेल करावा.... गंजेवार, कार्यवाह, कार्टुनिस्ट कंबाईन.

एस.एम.एस. वाचून बैलाचे अंग शहारते तसे झाले, आनंद झाला. एका मोठ्या संस्थेने माझ्यासारख्या किंचित व्यंगचित्रकाराची दखल घेणे हा माझा सन्मान होता. आणखी काम करण्यासाठी हुरुप आला. वाचकहो, तुम्ही-सुद्धा प्रभुतरुणासाठी कष्ट आणि वेळात वेळ काढून लिहिणाऱ्या तरुण लेखकांचे अभिनंदन करा, त्यांची दखल घ्या, म्हणजे ते प्रोत्साहित होऊन त्यांची उमेद वाढेल. हे अनुभवाने सांगतोय. जरूर करा.

५ मे १८९५ या दिवशी जोसेफ पुलितझर यांच्या न्युयॉर्क वर्ल्ड मध्ये 'धी यलो कीड' या कॉमिकचे प्रकाशन झाले होते. हास्य आणि व्यंगात्मक शैलीमुळे हळुहळू लोकप्रिय झालेल्या व्यंगचित्राचा सन्मान करण्यासाठी हा दिवस जगभर 'व्यंगचित्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्रातील ८० पेक्षा अधिक व्यंगचित्रकारांनी व्यंगदर्शन संमेलन आणि प्रदर्शनात भाग घेतला होता. प्रभुतरुणाने घडवलेला त्यातील मी एक होतो.

१६ एप्रिलला संमेलनाचे उद्घाटन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस आणि वसंत सरवटे यांना 'जीवन गौरवा'ने सन्मानित करण्यात आले. बाबासाहेब शुभेच्छा देताना म्हणाले की, आपल्या कलेमुळे आपण लोकांना किती आनंद देत हसवत आहोत याची खुद्द व्यंगचित्रकारांना कल्पना नसेल. व्यंगचित्रकार राज ठाकरे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. ते म्हणाले ''व्यंगचित्रासाठी अभ्यास व सरावाची आवश्यकता असते.'' शि. द. फडणीस उत्तरादाखल म्हणाले, ''चित्राच्या एका रेषेतही हजारो शब्दांचा ऐवज सामावू शकतो. त्यामुळे चित्र लहान असले तरी चालेल. परंतु मनाचा कॅनव्हास मात्र मोठा ठेवा.'' प्रकृती अस्वास्थ्यामुळे वसंत सरवटे हजर राहू शकले नाहीत. संस्थेचे अध्यक्ष श्री चारुहास पंडित यांनी ह्या क्षेत्रात तरुण आणि महिलांचे प्रमाण कमी असल्याबद्दल खंत व्यक्त केली.

आपल्या पाठारे प्रभु ज्ञातीतील पहिली 'महिला व्यंगचित्रकार' ह्या प्रभु तरुणाच्या संपादिका सुहासिनी कीर्तिकर आहेत. यांची व्यंगचित्रे दिवाळी अंकात प्रदर्शित झालेली होती.

संमेलनाच्या दुपारच्या सत्रात विकास सबनीस यांनी 'व्यंगचित्रे लोकल ते ग्लोबल' या विषयावर मार्गदर्शन केले. संजय मिस्त्री यांनी आपल्या मिठ्ठास वाणीने व्यंगचित्रकलेचा इतिहास अभ्यासपूर्वक उलगडून सांगितला. विवेक मेहेत्रे यांनी 'रंगमंचीय सादरीकरणासाठी प्रभावी माध्यम' यावर भाष्य केले. दि. १७ रोजी चेतन शर्मा - व्यंगचित्रकारांचे स्वप्न 'ॲनिमेशन', डॉ. दीपक शिकारपूर - व्यंगचित्रकारांसाठी इंटरनेट व सोशल मिडियातील संधी, डी.एन.ए.चे मंजुल व्यंगचित्रकलेचा प्रवास, बाबू गंजेवार - ग्रामीण व्यंगचित्रकारांची कथा आणि व्यथा, आणि शेवटी प्रशांत कुलकर्णी यांनी दिवाळी अंकातील व्यंगचित्रे यावर मार्गदर्शन केले.

प्रदर्शनात महाराष्ट्रातील निवडक व्यंगचित्रकारांची चित्रे प्रदर्शित करण्यात आली होती. त्यात प्रभु तरुणाच्या 'हसरी-रेखा'काराची दोन व्यंगचित्रे प्रदर्शित केली होती. प्रदर्शनात फिरताना सुरेखा मला म्हणते, ''असे वेडेवाकडे होऊन का फिरतायत?'' तिला कसं कळणार; माझी छाती दोन इंचांनी फुगली होती. मी प्रदर्शन पाहताना हळूच मागे वळून माझ्या चित्रांकडे पाहिले तर माझी बायको

(पान ५ कॉलम ३ वर)

# आम्ही चार पाठारे प्रभू

**-नीलिमा राणे** (न्यू जर्सी, युएसए)
neelimarane@yahoo.com

लता त्रिलोकेकर गेली हे ऐकून मन भरून आलं. डोळ्यासमोरून गेली तीसपस्तीस वर्ष सरकली आणि मला आमचे मस्कतमधले दिवस आठवले. त्यावेळी आम्ही चार पाठारे प्रभु कुटुंब होतो. लता व कुमार त्रिलोकेकर, अरुणा व चंदू धुरंधर, अरुणा व सुरेश तळपदे आणि आम्ही दोघं म्हणजे मी व सुजन. आम्ही एका जातीचे असल्या कारणाने आमच्या मैत्रीच्या सहवासातला हा धागा अगदी मजबूत होता. मस्कतसारख्या वाळवंटाच्या अरबी देशात त्यावेळी जीवन कित्येकदा कंटाळवाणं वाटायचं. पण तिथले सांस्कृतिक कार्यक्रम आम्हा सर्व मराठी लोकांना कार्यरत ठेवायचे. अशा कार्यक्रमात लता पुष्कळदा आपला सहभाग त्या सर्वांच्या लक्षात राहील अशा पद्धतीने करायची. त्यात तिचं लिखाणावरचं प्रभुत्व लोकांच्या मनात भरल्याशिवाय रहायचं नाही. 'शाकुंतल ते मंदारमाला' ह्या नाट्य संगीताच्या कार्यक्रमात मस्कतमधल्या १६ स्त्री पुरूषांनी भाग घेतला होता. कार्यक्रमाला ऐतिहासिक महत्त्व होतं कारण त्यात १९व्या ते २०व्या शतकातील गाजलेली गाणी होती व तिथले स्थानिक कलावंत चांगले गाणारे होते. लताने पूर्ण कार्यक्रम इतक्या व्यावसाईक रित्या हाताळला की तो तिथल्या मराठी लोकांत एक कौतुकाचा विषय झाला होता. त्यावेळी ज्या नावाजलेल्या मराठी व्यक्तींच्या संपर्कात आम्ही आलो त्यात पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, शंतनुराव किर्लोस्कर व अजित वाडेकर हे प्रमुख होते. या सर्व सामाजिक कार्यक्रमांत लताचा भाग मोठा असायचा. मला आठवते की एकदा लताच्या घरी पु.लं.ना जेवायला बोलावलं असताना आम्ही दोघं होतो. पु.ल. पाठारे प्रभूंच्या खाण्याच्या प्रकारांचे फार कौतुक करत होते. तसंच लता आपल्या जातीच्या रिती पाळण्यात तत्पर होती. पिठोरी अमावास्येच्या निमित्ताने न विसरता मला वाण घेण्यासाठी बोलवायची. एका दिवाळीच्या कार्यक्रमात सुजननी मानापमान नाटकातील धैर्यधर ह्या प्रमुख पात्राची भूमिका केली होती आणि आयत्या वेळी सुजनना अपघात होवून पायाचं हाड तुटलं होतं. अशा निराशाजनक परिस्थितीत लताने मोठ्या आपुलकीने त्यांच्यासाठी चाकाच्या खुर्चीची व्यवस्था केल्यामुळे सुजन आजूबाजूला हालचाल करून मंचावर पायाला प्लाष्टर बांधून उभे ऱ्हायले. आम्ही सर्वांनी नाटक सादर केलं आणि लोकांचा विरस टळला. एकदा तिने बऱ्याच अरब स्त्रीयांना घरी चहापानासाठी बोलावलं होत. फार मजा आली. मला अरबी भाषेचं ज्ञान असल्या-कारणाने मी दुभाषीचं काम केलं, त्यामुळे त्या अरबी स्त्रीया मनमोकळेपणाने बोलायला लागल्या . भाषा आपल्याला एकमेकांच्या किती जवळ आणते याचा तो चांगला नमुना होता. अशा प्रसंगांनी भाषेचं महत्त्व पटते. भाषेमुळे दोन निरनिराळ्या धर्माचे लोकसुद्धा मित्र होवू शकतात

आता ते दिवस आठवले की वाटते लताचा आम्हाला किती आधार होता. तिच्या सहवासाची जाणीव आता प्रखरतेने होते व मन दुखी होते. काही लोक त्यांच्या कर्तृत्वाने मोठे होतात आणि त्यांची आठवण लोकांच्या मनात सदैव सोडून ह्या जगाचा रामराम घेतात, त्यांत लता खचितच होती .

*(लताताईवरील माझ्या लेखात सिंगापूरऐवजी मस्कत हवे होते. –संपादक)*

✳

## कोणे एके काळी आकाशवाणी झाली

**- चारूदत्त धैर्यवान**

देव आणि दानव लागले अमृत  
शोधू...  
युगांवर युगे गेली  
आता आले कलयुग  
पाप आणि पुण्य कर्माचा खेळ झाला  
सुरु  
बनू लागले सारेच आता माथेफिरू  
नवी आशा, नवे आश्वासन  
आले घेऊन नवे नामदार  
अच्छे दिन देतो मी सकल जना  
साथ दे रे मला मतदारा  
परत झाला सुरु शोध जुना  
मंथन माजले चारी दिशांना  
समर्थक असो वा विरोधक  
शोधू लागले अच्छे दिन तडक  
ढवळून निघे सर्व समूह आता  
लहान असो वा थोर  
सारेच करू लागले शोर  
शोधाच्या ह्या मंथनात  
हाती येताहेत अजब अजब दोर  
उजेडात येऊ लागले भले भले चोर  
घडेल काही तरी नक्की आता  
ह्याची मजला आहे आस  
लवकरच होईल वाईट वृत्तीचा नास  
घडेल बदल आता जातील हे ही दिन  
हिंदुस्थानात येतीलच अच्छे दिन...

# पाठारे प्रभु सोशल समाज आणि हौशी कला मंदिर टेनिस बॉल बॉक्स क्रिकेट टुर्नामेंट २०१६

पाठारे प्रभु सोशल समाज आणि हौशी कला मंदिर या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने २९ मे, २०१६ रोजी विलिंग्टन क्रिसेंट ग्राऊंडवर टेनिस बॉल बॉक्स क्रिकेट टुर्नामेंट आयोजित केली होती. श्रीमती स्वाती पी. तळपदे यांनी या टुर्नामेंटचे उद्घाटन केले. यश माधव नवलकर हा बारा वर्षांचा मुलगा सर्वात तरुण खेळाडू होता तर; श्री. दिवाकर विनायक कोठारे, वय ७६ हे सर्वात ज्येष्ठ खेळाडू होते. टीम एच्‌ला श्री रोहित डी जयकर यांच्या नेतृत्वाने विजय मिळवून दिला. श्री. उदय रवीन् तळपदे कर्णधारपदी असलेल्या टीम बी ने उपविजेतेपद मिळविले. श्री. परज बन्सी धुरंधर यांना उत्कृष्ट 'फलंदाज' म्हणून ढाल मिळाली; तर क्षेत्ररक्षणाची ढाल इशान दीपक कोठारेंनी पटकावली. श्री. प्रकाश बा. नायक यांच्या स्मृत्यर्थ त्यांच्या पत्नी कानन यांनी इशानला पारितोषिक देऊन गौरविले. श्री. अक्षय संदीप कोठारे हे 'मॅन ऑफ द मॅच' ठरून त्यांनी ट्रॉफी पटकाविली.

या खेळात सहभागी झालेल्या महिला खेळाडूंना खास गौरविण्यात आले. कै. श्री. नवीनचंद्र (गोविंद) शामराव धैर्यवान यांचे सुपुत्र श्री. चारुदत्त यांनी वडिलांच्या स्मृत्यर्थ सर्व बक्षिसे प्रदान केली होती. श्री. धीरेन रामदास धुरंधर यांच्याकडून टेनिस बॉलची देणगी प्राप्त झाली. श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे, श्री. मिलिंद मनोहर व्यवहारकर, श्री. सुनील माधवराव धैर्यवान, श्री. प्रणव शिवनाथ देसाई, श्री. उमेश गजानन कोठारे, श्री. बन्सी सदाशिव धुरंधर, सौ. नीलन आणि दीपक माधव धैर्यवान, श्री. विनीत रामचंद्र जयकर यांनी या खेळाच्या यशस्वी आखणीसाठी मुक्त हस्ते देणग्या दिल्या. पाठारे प्रभु सोशल क्लबचे सचिव श्री. नरेश एस. मानकर तर्फे सकाळचा चहा आणि नाश्ता, तर श्री. सुजीत यशवंतराव कीर्तिकर आणि श्री. सुनील मनोहर जयकर यांच्यातर्फे दुपारचे भोजन देण्यात आले. सर्व खानपान व्यवस्थापन श्री. सुधीर बाबुराव धुरंधर यांचे होते. सं. कार्यवाह श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर, सौ. नीता मिलिंद सेंजित आणि श्री. अभिजीत सुरेश विजयकर तसेच श्री. अतुल-अजित मोरेश्वर जयकर आणि श्री. रोहित ज्ञानेश्वर जयकर या सो. समाज आणि हौशी कला मंदिराच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले होते. श्री. विजय गजानन धराधर आणि धावसंख्या नोंदविणारे श्री. संतोष रा. नवलकर यांनीही ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. 'एमसीए'च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य असणाऱ्या श्री. विनोद देशपांडे यांच्या हस्ते बक्षिस वितरण झाले. या स्पर्धेला परभांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धा आयोजनात हातभार लावणाऱ्या संस्थापक श्री. मनु मीर यांना स्पर्धेपूर्वी कृतज्ञ श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. परभू खेळाडू वृत्तीचेही आहेत आणि कृतज्ञता त्यांच्या वृत्तीत भिनली आहे त्याचा यावेळी प्रत्यय आला.

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. प्रतिभा आणि श्री. जगदीश गजानन कीर्तिकर यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ रु. २५०१/-

✶ सौ. मनिला आणि श्री. अनिल पूर्णचंद्र राव यांजकडून त्यांच्या विवाहाच्या माणिक महोत्सवाप्रीत्यर्थ रु. १०००/-

✶ श्री. सुरेंद्र गजानन विजयकर यांच्या ७५व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सौ. प्रतिभा सुरेंद्र विजयकरकडून रु. ५००/-

✶ सौ. प्रणिता आणि श्री. अरविंद धराधर यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवा प्रीत्यर्थ रु. २५१/-

✶ श्री. विठोबा गजानन नायक यांजकडून त्यांची नात निशीता नीलेश नायक आर्किटेक्चर परीक्षेत मुंबई विद्यापीठातून सर्वप्रथम आली; या आनंदाप्रीत्यर्थ रु. २५१/

✶ सौ. सुहास आणि श्री. नंदकुमार के. विजयकर यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ रु. २५०/-

✶ श्रीम. रजनी आ. अजिंक्य यांजकडून सौ. सोनल रो. नवलकर यांची ताज एज्यु. ग्लोबमध्ये जनरल मॅनेजर झाल्याबद्दल रु. १००/-

✳

## अभिनंदन

✶ श्री. शीतल तळपदे हे प्रकाश योजनाकार म्हणून मान्यताप्राप्त पुरस्कारांनी सन्मानित असे 'प्रकाशातील परभू'. लोकसत्तेत त्यांचे कर्तृत्ववान व्यक्तिमत्व ओळखीचे होईल असे पानभर मनोगत 'प्रकाशित' झाले. अभिनंदन.

✶ श्री. रामदास भटकळ आणि मृदुला प्रभुराम जोशी यांचे सहलेखन असलेले 'पॉप्युलर रीतिपुस्तक'. या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'लक्षणीय साहित्य निर्मिती'चा भालेकर पुरस्कार जाहीर झाला. अभिनंदन.

✶ सौ. सोनल रो. नवलकर यांची ताज एज्युकेशन ग्लोबमध्ये जनरल मॅनेजरपदी नियुक्ती झाली. अभिनंदन.

✶ वनारसे आजींवर 'लंडनच्या आजीबाई' हे नाटक रंगभूमीवर येत आहे. त्याचे नेपथ्यकार आहेत श्री. अमर अजिंक्य. अभिनंदन.

✶ श्री. मुकुंद खंडेराव कोठारे यांना ग्राहक पंचायततर्फे कै. एम. आर. पै ॲवार्ड ग्राहक चळळीतील कार्याबद्दल प्राप्त झाले. अभिनंदन.

✶ पाठारे प्रभु महिला समाजाच्या विश्वस्त म्हणून श्रीमती सुबोध प्रधान आणि अध्यक्ष म्हणून सौ. नीता मिलिंद संजीत यांची एकमताने निवड झाली. अभिनंदन.

✳

## परीक्षेतील सुयश

**डिप्लोमा इन थिअरी ॲण्ड प्रॅक्टिकल ऑफ दी अर्ली चाईल्डहूड केअर एज्युकेशन ॲण्ड ॲडमिनीस्ट्रेशन**
**(पोदार इन्स्टिट्यूशन ऑफ एज्यु.)**
सौ. सुमेधा केतन धुरंधर, विशेष गुणवत्तेसह

**बारावी, कलाशाखा**
कु. देवश्री अमोघ वैद्य, ८० टक्के
श्री. साहिल प्रशांत देसाई, ५५ टक्के

**बारावी, कॉमर्स**
कु. अंजोर परेश कोठारे, ९१ टक्के

**आर्किटेक्ट (मुंबई विद्यापीठ)**
कु. निशीता नीलेश नायक
मुंबई विद्यापीठातून सर्वप्रथम. अभिनंदन

✳

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

चि. अरिकेत (पूर्वांश) मोनित रसिक विजयकर

### विवाह सुवर्ण महोत्सव

८-५-१६ श्री. अरविंद आनंदराव धराधर कु. प्रणिता केशव धैर्यवान
३-५-१६ श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर कु. सुहास सुरेन्द्र जयकर
१३-६-१६ श्री. नीतिन वसंतराव देसाई, कु. आशा माधवराव कोठारे

(पान ५ कॉलम ४ वरून)

चित्रांच्या पुढे उभी राहून स्माईल करत सेल्फी घेत होती. बहुतेक मैत्रिणींमध्ये भाव खाण्यासाठी असेल. ''या संमेलनाच्या निमित्ताने मागे वळून पाहताना सलग ९ वर्षे 'हसरी रेखा', १८ वर्षे प्रभु तरुण दिवाळी अंक, अन्य दिवाळी अंक, हास्योपचार पुस्तकात व्यंगचित्र-परिचय असा २५० व्यंगचित्रांचा प्रदीप, तू टप्पा गाठलायंस कळलं का? माझं तुझ्यावर बारीक लक्ष असते समजलं. तुझा सर्व रेकॉर्ड माझ्याजवळ आहे. म्हणून ही आकडेवारी तुला पटकन देऊ शकले.'' इति सुरेखा. मी ''ठ्यांक्यू... ठ्यांक्यू...''

माझे पहिले व्यंगचित्र मित्रवर्य सुहास कोठारे यांनी पा. प्र. चॅरिटीजच्या निवडणुकीसंदर्भात छापले होते. संस्थेचा निवडणुकीवरील खर्च टाळावा हा हेतू होता. चित्र हॅन्डबिलावर छापून मला चॅरिटीजच्या बिल्डिंगखाली रस्त्यावर उन्हात उभा केला होता. पत्रक वाटायला. त्याच्याबरोबर माझ्याशिवाय कोणीच नव्हते. बाकी अनेकजण समोरच्या टीममध्ये होते.

'व्यंगदर्शन' संमेलनापासून बरेच काही शिकायला मिळाले. मुख्य म्हणजे माझ्या व्यंगचित्रातील उणीवा कळू लागल्या. उत्कृष्ट व्यंगचित्र कसे असते हे समजू लागले. कळलेल्या चुका सुधारून दररोज स्केचिंग करण्याचा मानस आहे. पल्ला खूप लांबचा आहे. जमल्यास गाठू. हे सर्व माझ्या उत्तरार्धात मला समजतंय. पूर्वार्धात ओळख व्हायला हवी होती. व्यंगचित्र कलेत प्रगती हवी असेल तर दररोज एक तरी रेखाटन व्हायला हवे. ह्यासाठी वयाचे बंधन नसते. जमेल तसे काढावे. निवृत्ती घेतलेल्यांसाठी फुल टाईमपास कंटाळा येणार नाही याची गॅरेन्टी. पाठारे प्रभु हा व्यंगचित्रकार नक्कीच असतो. आपल्याकडे परंपरा आहे. माझ्या बालपणी परभांची मोठ्ठी घरे पाहिलीत. सर्वजण ओटीवरच्या बाकेवर बसून येणाऱ्या हास्याच्या गडगडाटात स्वतःची करमणूक करून घेत. जन्मतः प्रत्येक माणसाकडे व्यंगचित्रकाराची दृष्टी असते. सभोवती घडणाऱ्या घटनांचे सतत निरीक्षण करून त्या निरीक्षणानुसार जाणवणारे प्रसंग व्यंगचित्राद्वारे रूपाने आकारतो. अनपेक्षितता जिथे असते तिथे व्यंगचित्र जन्मते. व्यंगचित्र ही भाषा आहे. कुंचल्यातून साकारलेल्या रेषा समाजमनाचा ठाव घेतात. व्यंगचित्र वाचकांना आनंद देतात. ती फुलासमान आहेत. चित्र छान जमले की सृजनाचा आनंद मिळतो. वेळ मजेत जातो आणि यासाठी कोणाची गरज लागत नाही. कागद, पेन्सील आणि तुम्ही आणि तुमची विचारशक्ती. मानसिक ताण आणि रक्तदाब नॉर्मल होतो. चित्र काढणे हा देखील मेडिटेशनचा प्रकार आहे. डोक्यात येणाऱ्या व्यंगचित्रांचे विचार कागदावर रेखाटन

व्यंगचित्रकार करू शकला नाही तर तो त्याचा पराभव असतो. गिरगावातील व्यंगचित्रकारांना कार्टुनिस्ट कंबाईन या संस्थेतर्फे एकत्र आणून, प्रदर्शन, कार्यशाळा इत्यादी कार्यक्रम करून व्यंगचित्राची आवड जास्तीत जास्त लोकांपुढे निर्माण करण्याची आणि आगामी काळात अधिकाधिक छान छान व्यंगचित्रे तुमच्या पुढ्यात ठेवण्याची मनिषा आहे.

त्या दृष्टीने पावले टाकली आहेत. कार्टुनिस्ट कंबाईन, गिरगांव संस्थेतर्फे गिरगावात व्यंगचित्रकारांची चळवळ उभी करण्याची मुहूर्तमेढ माननीय युवा सेना नेते आदित्य ठाकरे यांच्या हस्ते ५ मे रोजी स. का. पाटील उद्यानात रोवली गेली.

✳

## पत्र प्रतिक्रिया

संपादक, प्रभु तरुण यांस,

प्रभु तरुण वाचताना वाचकांच्या चेहऱ्यावर एक वेगळी 'हसरी रेखा' प्रकर्षाने उमटते.

साहित्यपूर्ण लेख व इतरही वाचनीय मजकूर हे तर आपल्या प्रभुतरुणाचे वैशिष्ट्यच! त्यातच आता गेला काही काळ आपले व्यंगचित्रकार श्री. प्रदीप कोठारे यांच्या सुरेख व्यंगचित्रांची भर पडली आहे. या व्यंगचित्रातून प्रतीत होणारी त्यांची कल्पनाशक्ती खरोखरच कौतुकास्पद! प्रभुतरुणाच्या दीपावली विशेष अंकातील त्यांची व इतरही व्यंगचित्रकारांची व्यंगचित्र दीपावली अंकाचा व पर्यायाने दीपावलीचा आनंद द्विगुणीत करतात. त्यांच्या व्यंगचित्रांची उदाहरणे अनेक देता येतील. पण वानगीदाखल म्हणजे प्रभुतरुणाच्या एप्रिल व मे महिन्याच्या अंकांतील व्यंगचित्रांचा उल्लेख करता येईल. हल्ली तरुण-तरुणी ज्या फाटलेल्या जीन्स एक फॅशन म्हणून घालतात त्यावर व्यंगचित्रातून केलेले भाष्य खरोखर अंतर्मुख करणारे! मागे एकदा त्यांनी चितारलेले प्रीती झिंटा आणि नेस वाडिया यांच्या तत्कालीन वादावर मिश्कील भाष्य करणारे व्यंगचित्र त्यांच्या अनेक सुरेख व बोलक्या व्यंगचित्रांपैकी खास उल्लेखनीय! किंबहुना जगातील मुशाफिरी आम्हाला केवळ प्रभुतरुण अंकांतील त्यांच्या व्यंगचित्रांतूनच समजली. अनेक शब्दांनी जे सांगता येत नाही ते केवळ काही रेषांद्वारे अतिशय समर्पक व परिणामकारकरित्या सांगण्याची व्यंगचित्रांची महती आपण सारे जाणतोच.

श्री. प्रदीप कोठारेंचे खरोखरच अभिनंदन!

आगे बढो प्रदीप! हम सब आपके साथ हसते रहेगे, जिंदगीकी मजा और लेते रहेंगे! ब्रव्हो!

आपला,
दीपक माधव धैर्यवान

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादकः श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67